PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES VOL 4, ISSUE 3

# उद्योजकता समस्या व उपायांचे अध्ययन

**डॉ. नीता धर्माधिकारी**
**असोसिएट प्रोफेसर**
**जी. एस. कॉलेज ऑफ कॉमर्स अॅण्ड इकॉनॉमिक्स**
**नागपूर (महाराष्ट्र) भारत**

## सारांश:-

उद्योजकता ही व्यक्तीने अथवा व्यक्तीसमुहाने नफा कमावणे हे अंतिम ध्येय निश्चित करून चालवलेल्या व्यवसायातील हेतू परस्पर कार्य असते. उद्योजक उद्योजकता दोन्ही शब्द वेगवेगळ्या अर्थाने वापरले जातात. उद्योजक हा व्यवसायाचा मालक असतो. व त्याने केलेली कृषी म्हणजे उद्योजकता होय.

उत्पादन पद्धतीने जो बदल घडवून आणतो व अर्थव्यवस्थेत ही बदल घडवून आणतो ती म्हणजे उद्योजकता होय.

भारतीय अर्थव्यवस्थेचा आधार कृषी असून सहाय्यक जोडधंद्यावरही ग्रामीण जनता निर्भर असते. परंतु कृषी स्तिथी चांगली नाही, तिच्या अवस्थेत सुधरणा करून उत्पादन क्षमता वाढविणे गरजेचे आहे. या संदर्भात सरकारद्वारा धोरण व योजनांची आंखणी केली जाते. त्याबरोबर पशुपालन, फुलभाज्या, फुलांची शेती, धान्यावर प्रक्रिया करण्याची गतीही मंद आहे. परिणामत: ग्रामीण भागात दारिद्रय आढळून येते. सतत

कृषीची नापीकता. अल्पभूधारकांची जास्त संख्या हवे ते काम न मिळणे यामुळे ग्रामीण जनता गावातून पलायन करु लागले. गावाचा विकास झाला तर राष्ट्राचा विकास होईल, ह्या भावनेला तडा जातो. ग्रामीण जनता रोजगारासाठी शहरात आल्यास शहरात लोकसंख्येचा भार जास्त पडेल. शिक्षित युवकांना त्यांच्या शिक्षणानुसार काम मिळत नाही. जे मिळते त्यातून त्यांना जीवन निर्वाह करणे कठीण होते. समाजात एकंदरीत निराशेचे वातावरण निर्माण होते. दारिद्रय आणि बेरोजगारी चक्र सतत चालू होते. अर्थव्यवस्थेचे गती कमी होण्याचे हे लक्षण आहे. युवकांना काम देणे, त्यांना आत्मनिर्भर बनविणे, त्यांचे दारिद्रय दूर करणे, उपलब्ध संसाधनाचा उपयोग करणे याउद्देशाने उद्योजकता संकल्पना आली. रोजगार मिळाल्याने बेरोजगारी, गरीबी दूर होईल. प्रतिएकक उत्पन्न वाढेल, त्यांच्या मनात आत्मविश्वासाची भावना वाढीस लागेल, सामंज्यस, एकता, मूल्य, संरक्षण मूल्यसंवर्धनाचा विकास होईल. राष्ट्रीय उत्पन्न वाढल्याने विकासाची गती वाढेल.

प्रस्तुत पेपरमध्ये उद्योजकतेच्या भुमिकेबाबत अभ्यास करून उद्योजकतेद्वारे अर्थव्यवस्थेची गती कशी वाढेल याची कारण मीमांसा केली आहे.

**मूळशब्द:-** अर्थव्यवस्था, उदरनिर्वाह, कृषी, रोजगार, उद्योजकता.

## प्रस्तावना:-

आर्थिक क्षेत्रात कृषीचे स्थान महत्वपूर्ण आहे. कृषी ही सर्व उद्योगाची जननी असून संपन्नता आणि प्रगतीचे सूचक आहे असे समजण्यात येते. विकसित व विकसनशील देशात आर्थिक विकास करणे हे महत्वपूर्ण उदिष्टे आहे. आपल्या जवळ असलेली नौसर्गिक संसाधना, आहे ती परिस्तिथी व क्षमतेचा उपयोग करून कृषीचा गुंतवणूक दर्जा वाढविण्यासाठी प्रयत्न केला जातो. कृषी हा मुख्य व्यवस्था असल्याने तिची प्रगती कशी होईल याचा सतत प्रयत्न करण्यात आला आहे. कृषी ही औद्योगिक

विकास, व्यापार व वाणिज्याचा आधार आहे. परंतु कृषीचे परंपरागत व अशास्त्रीय पद्धतीने शेती करण्यामुळे उत्पादकता कमी होते. खाद्यान्न उत्पादन, कृषी सहाय्यक उत्पादन, याकरिता अवजारे, यंत्रसामग्री, खते, बी-बियाणे, ई. वितरण व विपणन ई. क्रियाही सम्मलीत आहे. कृषीच्या काही मर्यादांमुळे ग्रामीण जनता कर्जबाजारी होत आहे. कर्जाचा बोझा वाढतच आहे आणि म्हणूनच शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढत आहे. खासकरून विदर्भात हे प्रमाण जास्त असल्याने सरकारद्वारा त्यांचे कर्ज माफ करून त्यांना पॅकेज उपलब्ध करून देण्यात येत आहे. ग्रामीण जनता या चक्राला कंटाळून गेली आहे. निर्धनता व बेरोजगारी या चक्रात फसलेली आहे. आणि इथूनच ग्रामीण उद्योजकता ही संकल्पना समोर आली.

शहरी भागातही ग्रामीण जनता रोजगारानिमित्य वस्तीसाठी आल्याने लोकसंख्या व उपलब्ध रोजगाराच्या संधी यामध्ये दरी पडली आहे. शिक्षण असूनही नोकरी नाही. आहे त्यात समाधान नाही. सुशिक्षित उच्चपदवीधरांची ही आजची शोकांतिका आहे.

वर्तमान परिस्तिथीमध्ये बेरोजगारी अवस्था ही विश्वव्यापी झाली असून. विकसनशील राष्ट्रात लोकसंख्या वाढीची गती व रोजगार वाढीची गती भिन्न आहे. बेकारी ही ऐच्छिक व अनैच्छिक स्वरूपात आढळून येते. मौसमी, अदृश्य, शिक्षित बेकारी ई. प्रकार आहेत.

बेकारीचे ग्रामीण व शहरी असे स्वरूप आहे. त्याची दुसरी महत्वाची अवस्था म्हणजे गरिबी होय. कुपोषण, अल्पपोषण, शोषण, भ्रष्टाचार, नौतिक अवमुल्यन ई. शाप गरिबीमुळे चिकटतात. रोजगाराच्या कमी संधी, कमी उत्पन्न, लोकसंख्या वाढ, दोषपूर्ण विकास रणनीती, निरक्षरता, अज्ञानता, रूढीवाद, संयुक्त कुटुंब पद्धती ई. कारणांमुळे भारतात गरीबीचे प्रमाण वाढत आहे. भारत सरकारद्वारा या समस्या

सोडविण्याकरिता वेळोवेळी विविध कार्यक्रमाची अंमलबजावणी केली परंतु यामध्ये काही समस्या आल्यात.

"आर्थिक विकासातील गरिबी आणि बेकारी कमी करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे उद्योजकता विकास होय."

उद्योजकता कोणतीही परिस्तिथी अनुकूल नसतांना काहीतरी नव्याने उत्पन्न करण्याची व निर्माण करण्याची क्षमता होय. दिवसेंदिवस बदलत्या परिस्तिथीतीत उद्योजकता ही संकल्पना बदलत जाते. उद्यमी हा शब्द फ्रेंच भाषेचा शब्द "Enterprendre" पासून घेतला आहे. उद्योजकता याचा अर्थ अशी प्रवृत्ती ज्याद्वारे व्यवसायाच्या संबंधित अनेक जोखमींचे आणि अनिश्चतेचा सामना करणे होय. अनिश्चतेचाविमा काढल्या जात नाही, व पूर्वानुमानही केल्या जात नाही. अश्या जोखीम स्विकारण्यालाच उद्योजकता असे म्हणतात. उद्योजकतेचा आशय असा आहे कि, योग्यता अशी  ज्याद्वारे काही वैशिष्ट्ये करण देण्याचा प्रयत्न करण्यात येतो. उद्योजकताचा अर्थ नवप्रवर्तन आहे.

थोडक्यात उद्योजकता म्हणजे समाजातील भावी गरजांचे पूर्वानुमान करून संसाधनांना नवीन, सृजनात्मक आणि कल्पनापूर्ण उपाययोजनाद्वारे पूर्तता गरजांची पूर्णता करण्याकरिता केलेल कार्य होय.

व्यवसायामध्ये असणारी अनिश्चतता व जोखीम स्वीकारण्याची क्षमता, उत्पादन साधनांवर प्रभावी नियंत्रण ठेवणे व त्याचे योग्य रुपांतर करणे, उत्पादन साधनांना एकत्रित करणे ई. करिता प्रयत्न केले जातात. उद्योजकतेमध्ये नवप्रवर्तनाला वाव असतो. उद्योजकतेमुळे व्यक्तीच्या असलेल्या गुणांना वाव मिळतो काही तरी नवीन करून दाखविण्याकरिता प्रेरणा मिळते. उद्योजकता एक सृजनात्मक क्रिया आहे. ती ज्ञानावर, परिणामावर आधारित आहे. उद्योजकाला व्यवसायिक कल्पना देणे, योजना बनविण्याचे ज्ञान देणे व नवीन उद्योग आरंभ करण्याकरिता ती प्रेरणा देते.

उद्योजकतेमुळे नागरी व शहरी विकास होतो परिणामत: अर्थव्यवस्थेच्या गतीला चालना मिळते.

**अध्ययनाची उद्देश:-**

१. उद्योजकता संकल्पना समजावून घेणे.

२. उद्योजकतेच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

**अध्ययन पद्धती:-** हा पेपर पूर्णत: दुय्यम स्त्रोतावर असून उपलब्ध माहितीच्या आधारावर लिहण्यात आला आहे.

**गृहीतक:-** उद्योजकता विकासात समस्या आहेत व त्या सोडविण्यासाठी उपाययोजना तर अर्थव्यवस्थेला बळकटी येईल.

प्रत्येक राष्ट्राची आर्थिक व सामाजिक परिस्तिथी वेगळा असते व विकास स्तरपण वेगवेगळा राहतो. प्रत्येक राष्ट्रात व्यवसायाच्याप्रती व्यक्तीगत दृष्टीकोन वेगळा असतो परिणामत: उद्योजकतेचे स्वरूपही वेगळे दिसून येते. उद्योजकताचे स्वरूप राष्ट्रानुसार बदलते.

**उद्योजकता प्रकार:-**

१. भांडवलाच्या मालकीच्या आधारावर:-

अ) खाजगी उद्योजकता, ब) सार्वजनिक, क) संयुक्त, ड) सहकारी स्वरूप आहे.

२.स्थानीय करणाच्या आधारावर:-

अ) केन्द्रीकृत, ब) विकेंद्रीकृत

३. साहसाच्या आधारावर:-

अ) दैनंदिन, ब) नवीन उद्यमियता

४. नेतृत्व आधार:-

अ) वैयक्तिक, ब) समूह

५. अन्य आधार:-

अ) शहरी व ग्रामीण, ब) रचनाबद्ध उद्योजकता

**उद्योजकांचे वर्गीकरण:-**

१. अनुवांशिक आणि पहिल्या पिढीतील

२. व्यक्तिगत आणि संस्थात्मक

३. तंत्रज्ञ

४. खाजगी व सार्वजनिक

५. व्यापारी

६. कृषी क्षेत्रातील

७. पुरुष व स्त्री उद्योजक

८. वास्तविक व प्रेरित

**उद्योजकता विकासावर परिणाम करणाऱ्या बाबी:-**

उद्योजकता विकास ही एक घटनात्मक व पद्धतशीर विकास प्रक्रिया आहे. औद्योगीकरणाचे प्रमाण वाढत असल्याने ज्या व्यक्तींच्या अंगी उद्योजकीय गुण आहे त्यांना उद्योगाच्या कार्याकडे आकर्षित करणे गरजेचे आहे. उद्योजकता विकास झाल्यास ते बलाढ्य राष्ट्र म्हणून ओळखल्या जाईल.

**घटक:-**

१. अंतर्गत, २. बाह्य घटक.

अंतर्गत घटक:-

१. अभिप्रेरण , २. कौशल्य, ३. ज्ञान व माहिती, ४. शिक्षण, ५. मानस शास्त्रीय घटक, ६. समाज

बाह्य घटक:-

१. समाज, २. आर्थिक, ३. राजकीय, ४. संस्कृतीक घटक

प्रमंडळ उद्योजकतेत सहभागी होण्यासाठी धाडसी वृत्ती, धोका पत्करण्याची तयारी, क्षमता, नवीन संधीचा लाभ घेणे अथवा असणे हे गरजेचे आहे. व्यक्तीने स्वंय रोजगाराचा मार्ग निवडणे म्हणजे तिचे धाडस, नविन काही करण्याची जिद्द होय. नोकरीत समाधान नाही म्हणूनही बरेचशे युवक उद्योजकतेकडे वळते.

**उद्योजकतेची गरज:-**

**१. भांडवल निर्मिती:-** देशातील बचतीत उत्पादन कार्यात लावण्याचे कार्य उद्योजकतेद्वारे होते. भांडवल निर्मिती एक महत्वपूर्ण समस्या आहे. ती व्यवसायिक कार्यात लावल्याने भांडवल निर्मितीचा दर वाढेल. उद्योजकतेत वाढ झाल्याने लोकांजवळील निधी वाढेल व बचतीचे प्रमाण वाढेल त्यातून भांडवलाची निर्मिती होईल.

**२. उत्पादन एकक:-** उद्योजक जर प्रशिक्षित असतील व उपकरण सुसज्जीत असेल तर अधिक एककांची स्थापना होऊ शकते. उद्योजकतेकरीता बुद्धी, यंत्र सामग्रीची गरज असते. जेवढी साधन हस्त तेवढे जास्त एककांची निर्मिती होईल.

**३. नवप्रवर्तन**:- उद्योजकता विकास म्हणजे काही तरी नवीन, संशोधन होय. व्यावसायिक चिंतनाला उद्योजकतेद्वारे प्रोत्साहन दिले जाते.

**४. साधनांचा उपयोग:-** देशातील असलेली उपलब्ध साधनसामग्रीचा उदा. कच्चा माल, मानवीय कौशल्य, नैसर्गिक संपदा, ई. चा पूर्णत:उपयोग करणे हे उद्योजकतेद्वारेच शक्य होते.

**५. रोजगार वृद्धी:-** रोजगारात वाढ होण्याकरिता नविन स्थापन झालेले उद्योग कारणीभूत होतात. स्थानिक समुदायातील गरजू व्यक्तींना रोजगाराची संधी मिळते. नवनविन उद्योजकतेची निर्मिती झाल्याने लोकांना रोजगार मिळेल.

**६. प्रतीएकक उत्पन्न:-** उद्योजकाद्वारे नविन उत्पादन निर्माण होते व सेवा वेगवेगळ्या प्रकारच्या प्राप्त होतात ज्यामुळे प्रतीएकक उत्पन्न वाढते व आर्थिक विकासाला वाव मिळतो.

**७. विषमता दूर होते:-** खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रात असलेली विषमतेची तफावत उद्योजकतेद्वारे दूर होते. कारण सरकारद्वारा आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या भागात उद्योग स्थापनेकरिता अनुदान व सवलती मिळतात. त्यामुळे विषमता कमी होईल.

**८. राहणीमान दर्जा:-** मागणीनुसार पुरवठा हे तंत्र उद्योजकताद्वारा पूर्ण होते. तसेच नवनविन वस्तू ग्राहकांना उपलब्ध होतात. त्यामुळे लोकांचे राहणीमान दर्जा वाढतो.

**९. सर्वांगिण विकास:-** अर्थव्यवस्थेची गती वाढण्याचे मुख्य कारण उद्योजकता होय. उद्योजकतेद्वारे उद्योजक अनेक बदल घडवून आणतो. पूरक उद्योगांची स्थापना होते व निर्यातीला वाव मिळतो.

**१०. आत्मनिर्भर समाज:-** उद्योजकतेमुळे गरजू व्यक्तींना काम मिळते विभिन्न क्षेत्रातील उत्पादकता क्रांती झाल्यामुळे आत्मनिर्भर समाज निर्माण झाला. कारण त्यांना कुणावर रोजगारकरिता अवलंबून राहावे लागत नाही.

**समस्या:-**

१. भांडवल अभाव

२. मार्गदर्शन अभाव

३. भिती

४. नैसर्गिक वातावरण

५. सामाजिक वातावरण

उद्योगनिर्मिती पासून त्याचे संचालन करतांना उद्योजकाला अनेक समस्यांना समोर जावे लागते.

**१. भांडवल अभाव:-** व्यवसायाची निर्मितीच्या वेळी आर्थिक भांडवलाची गरज असते. नविन उद्योगांमध्ये भांडवलची गुंतवणूक करण्यास सहज तयार नसतात. जे भांडवलप्राप्तीचे मार्ग आहे तेथूनही पुरेसे भांडवल मिळत नाही.

**२. जागेची समस्या:-** कोणत्याही उद्योगाची निर्मिती करण्याकरिता योग्य जागेची निवड करणे ही एक समस्या आहे. साधरण ज्या ठिकाणी तेथील उपलब्ध साधन व त्यांची कार्यक्षमता लक्षात घेतली आहे. स्थानीयकरणावर विशेष भर दिला जातो, अन्यथा या सुविधा मिळण्यासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च करवा लागतो.

**३. वाहतूक समस्या:-** आपल्याकडे परिवहनाचे साधने व रस्ते याबाबत समाधानकारक स्तिथी नाही. उद्योगाला लागणारा कच्चा माल मिळाला नाहीतर उद्योग बंद पासु शकतो.

**४. मार्गदर्शनाचा अभाव:-** नविन उद्योग चालू करतांना बऱ्याच गोष्टीचे मार्गदर्शन व प्रशिक्षण घेणे जरुरी आहे. तसे नसेल तर माहिती अभावी अडचणी निर्माण होतील.

**५. भीतीयुक्त भावना:-** उद्योजकतेचा स्विकार म्हणजे एक धाडसीपूर्ण पाऊल उचलणे होय. हे करतांना मनात जर भीती असेल, अपयश पचवायची ताकद नसेल तर उद्योगजकतेकडे लोक वाळणार नाही. भीती यापासून दूर नेते.

**६. नैसर्गिक वातावरण:-** उद्योजकतेला पोषक वातावरण नसेल तर कोणतेही गोष्ट करणे शक्य होणार नाही. स्थानिक नौसार्गिक वातावरण कसे आहे. यावर उद्योगजकता विकास निर्भर असतो.

**७. श्रमिकांचा पुरवठा:-** उत्पादनातील सक्रीय घटक श्रम असून त्याची मानसिकता, सौदेबाजी करण्याची क्षमता, मजुरीचा कमी दर, अज्ञानता, ई. कारणाने मागणी जेथे आहे तिथे श्रमिक पोचवू शकत नाही. मागणी ही विशेष कौशल्य असलेल्या कामगारांची जास्त असते. त्यामुळे काम थांबू शकतो.

**८. सरकारी धोरणे:-** कोणतेही धोरण ठरवितांना कोनत्या गोष्टीला प्रध्यान द्यावे हे सरकार ठरविते. आयात निर्यात धोरण जाहीर करतांना कधी कधी ज्या वस्तूचे आपल्या इथे उत्पादन होते त्याची ही आयात होते.

**९. परवाना धोरण:-** औदोगिक परवाना धोरण जाहीर करतांना ज्या क्षेत्रात विकास करायचा आहे त्याकडे विशेष कटाक्ष असतो. त्याठिकाणी औद्योगिक सोयी सुविधांचा अभाव असतो. अश्या ठिकाणी. उद्योजकतेत समस्या येतात.

**उद्योजकता वृद्धीकारिता उपाययोजना:-**

**१. ऋण व्यवस्था:-** व्यापार व उद्योगाच्या संचालनाकरीता भांडवलाची अत्याधिक गरज पडते. हे वित्त (ऋण) देण्याची व्यवस्था अनुसूचित बँका व औद्योगिक संस्थाद्वारे करण्यात येते.

**२. प्रोत्साहन देणे:-** उद्योजकतेचे महत्व बघता अनुदान देऊन प्रोत्साहन दिले जाते. या सहकार्याने उद्योजकता विकासाची शक्ती वाढते.

**३. प्रशिक्षण व्यवस्था:-** उद्योगाच्या संचालनाकरिता योग्य प्रशिक्षणाची गरज असते. ही व्यवस्था केल्याने संचालनात येणाऱ्या समस्यांचे निराकरण होते.

**४. शिक्षण आणि सामर्थ्य:-** उद्योजकता विकासासाठी शिक्षणाची गरज आहे. शिक्षणाने उद्योगांना येणाऱ्या आव्हांनाचा सामना करण्याची क्षमता निर्माण होते.

**५. साधनांची पुर्ती:-** व्यवसायाच्या आरंभापासून कच्च्या मालापासून ते बऱ्याच गोष्टीची गरज असते. त्याकरिता सरकार सहकार्य मिळते. जेणेकरून स्पर्धेत टिकण्याची भीती कमी वाटते व आत्मरक्षणाचे बळ प्राप्त होते.

**६. धोरणांमध्ये शिथिलता:-** उद्योजकाला विकासाकरिता सरकारद्वारा बरेचश्या धोरणांची घोषणा होते. परंतु त्यात कधी कधी जाचक अटीही असतात पण ती जोपासतांना अटींमध्ये शिथिलता आणण्यास उद्योजकतेसमोरील समस्या कमी होते.

**७. श्रमिकांची पूर्ती:-** श्रमिक हे मार्गदर्शनच्या अभावामुळे योग्य ठिकाणी पोहचत नाही त्याकरिता त्यांना मार्गदर्शन देणे, योग्य मजुरीबाबत धोरणांची अंमलबजावणी होते कि हे तपासणे गरजेचे असते. श्रमिकांना योग्य दराने मजुरी दिल्याने कामावर आनंदाने, उत्साहाने येतील.

**८. स्थानिक सुविधात वाढ:-** ज्या ठिकाणी उद्योजकता विकास करायचा आहे त्या क्षेत्रात सुविधांचा अभाव आहे तर अश्या सुविधा सरकारद्वारे उपलब्ध करण्याचा प्रयत्न केला जातो.

**निष्कर्ष:-**

१. आपल्या देशात जवळ जवळ उद्योजकता विकास कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यात येते. आणि त्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच आहे.

- राष्ट्रीय पातळीवरील संस्था:-

  १. भारतीय उद्योजकता विकास संस्था, अहमदाबाद.

  २. उद्योजकता लघु व्यवसाय विकास राष्ट्रीय संस्था, नवी दिल्ली.

  ३. खादी व ग्रामोद्योग मंडळ, तांत्रिक प्रशिक्षण संस्था

  ४. भारतीय स्टेट बँक ई.

- राज्य पातळीवर:-

  १. अशासकीय स्वंयसेवा संस्था

  २. शिक्षण संस्था, ई.

- महारष्ट्र उद्योजकता विकास केंद्र:- ०१ ऑक्टोबर १९८८, औरंगाबाद.
- समाजात उद्योजकांची भूमिका महत्वाची आहे.
- स्वावलंबन व आत्मनिर्भर समाजाची रचना झाली
- रोजगाराच्या संधी वाढल्याने गरिबी दूर झाली व राहणीमानाचा दर्जा सुधरला.
- ग्राहकांना विविध वस्तू उपलब्ध होतील.
- समाजाला योग्य नेतृत्व मिळाले.
- उद्योगजकतेच्या विकासामुले स्वातंत्र्य कायम राहते.
- स्वयंरोजगाराच्या माध्यमाने सन्मानाचे जीवन जगायला मिळते.
- देशाच्या अर्थव्यवस्थेला चलना उद्योजकता विकासामुळे मिळते.

- भारत सरकारने १९५६ नंतर पंचवार्षिक योजनेच्या माध्यमाने मागास भागाचा विकास करण्यासाठी उद्योजकांची स्थापना व्हावी म्हणून सोयी, सवलती व प्रोत्साहन दिले.
- भारतात अनेक अनुभवी, बुद्धिमान उद्योजक लाभले व कुठे लागताच राहतील.
- स्वातंत्र्यप्राप्ती नंतर उद्योगजकता कोणत्याही एका जातीची मक्तेदारी राहिली नाही.
- देशाच्या आर्थिक औद्योगिक पाया उद्योगजकतेवर निर्भर आहे.
- उद्योजकतेकरिता सरकारने करामध्ये सूट दिली आहे.

उद्योजकता विकास म्हणजे देशाचे प्रगतीचे मापदंड होय, उद्योजकता विकासात अडचणी आल्यातरी त्या सोडविण्याकरिता विविध उपायांचा अवलंब करण्यात येतो व विकास करण्यात येतो. म्हणून गृहीतक सत्य साबित झाले आहे.

## संदर्भ ग्रंथ:-

१. उद्यमियता विकास – डॉ. यु.सी. गुप्ता

२. उद्योजकता विकास – डॉ. अरुण येवले, डॉ. दिलीप पाटील, डॉ. दिनेश भक्कड

३. कौशल्य विकास – डॉ. देहलीवाल

४. व्यवसाय विकास - पी. एम. वाडेकर, एस. टी. निंबाळकर